**ठळक बातम्या**

- बाल विवाह रोखण्यासाठी लग्न पत्रिकेत वर आणि वधूची जन्मतारीख नमूद करण्यासाठी शासन प्रयत्नशील

- राज्याच्या काही भागांमध्ये मान्सूनला सुरुवात झाली असली तरी शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, असा कृषीमंत्र्यांचा सल्ला

- टीसीएस धर्मांतर प्रकरणासारख्या घटनांचा अभ्यास करुन कायद्यात सुधारणा सुचवण्यासाठी महिला सदस्यांची समिती स्थापन करण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा

**आणि**

- राज्यात अनेक ठिकाणी मोसमी पावसाची दमदार हजेरी

<><><><><>

राज्यात बाल विवाहाचं प्रमाण कमी करण्यासाठी लग्न पत्रिकेत वर आणि वधूची जन्मतारीख नमूद करण्यासाठी विधी आणि न्याय तसेच ग्रामविकास विभागांच्या मदतीने कार्यवाही करण्याचे प्रयत्न सुरू असल्याची माहिती महिला बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी विधानसभेत दिली. राजस्थानमध्ये बालविवाह रोखण्यासाठी ही पद्धत सुरू आहे. राज्यातले बालविवाहाचे प्रमाण १० टक्क्यांच्या आत आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. ज्या जिल्ह्यात हे प्रमाण जास्त आहे तिथे विशेष मोहीम राबवण्यात येत असल्याचं त्यांनी सांगितलं. गेल्या वर्षी राज्यात सुमारे पंधराशे आणि चालू वर्षात आतापर्यंत चौदशेहून अधिक बालविवाह रोखण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणानुसार २०१९-२१ या कालावधीत देशात बालविवाहाचे प्रमाण २३ टक्क्यांपेक्षा जास्त आणि राज्यात सुमारे २२ टक्के होतं. २०२३-२४ मध्ये काही जिल्ह्यात झालेल्या सर्वेक्षणानुसार हे प्रमाण राज्यात १९ पूर्णांक ७ दशांश टक्के झाल्याची माहिती त्यांनी विधानसभेत दिली. परभणी, बीड, धुळे, सोलापूर जिल्ह्यात बाल विवाहाचे प्रमाण ४० टक्क्यांपेक्षा जास्त असल्याची माहिती सरकारने लेखी उत्तरात दिली.

गेल्या आर्थिक वर्षात राज्यात ५ वर्षाखालील १२ हजार ७२९ बालकांचा आणि गेल्या ३ वर्षात ४० हजार ५५९ बालकांचा मृत्यू झाला. मुदतपूर्व जन्म, जंतू संसर्ग, न्यूमोनिया वगैरे कारणांमुळे हे मृत्यू झाले आहेत. हे प्रमाण कमी करण्यासाठी सरकारकडून विविध उपाययोजना सुरू असल्याची माहिती सरकारने विधानसभेत लेखी उत्तरात दिली आहे. दरम्यान, गेल्या ३ वर्षापासून राज्यातल्या कुपोषित बालकांचं प्रमाण कमी होत असल्याची माहिती सरकारने दिली आहे.

राज्याच्या काही भागांमध्ये मान्सूनला सुरुवात झाली असली तरी शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, असा सल्ला राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिला आहे. विधानसभेत एका चर्चेला उत्तर देताना भरणे म्हणाले की, शेतकऱ्यांनी प्रथम आपल्या शेतातली ओलाव्याची पातळी तपासून, पुरेसा ओलावा असल्याची खात्री झाल्यावरच पेरणी करावी. एल निनोसह हवामानातल्या इतर अनिश्चिततेचा सामना करण्यासाठी शेतकऱ्यांना कृषी विभाग मदत करेल असं आश्वासनही भरणे यांनी दिलं.

बोगस डॉक्टरांच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी कायद्यात दुरुस्ती करण्याचं सरकारचं नियोजन असल्याचं आश्वासन मंत्री वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी विधानसभेत दिलं.

दरम्यान, पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी शोक प्रस्ताव वाचताना झालेल्या चुकांबद्दल विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिलगिरी व्यक्त केली आहे. छापील भाषणाची प्रत अस्पष्ट होती, त्यात काही चुका होत्या त्यामुळे वाचताना चूक झाल्याचं ते म्हणाले. कोणाच्याही भावना दुखावण्याचा उद्देशाने नव्हे तर चुकून हे झाल्याचं त्यांनी मान्य केलं. इतरांच्या इतकाच मराठी भाषेचा अभिमान आहे आणि यापूर्वी अनेक भाषणं मराठीत केली आहे याकडे त्यांनी सभागृहाचं लक्ष वेधलं.

तत्पूर्वी राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत झालेल्या अनियमिततेच्या निषेधार्थ विरोधी पक्ष सदस्यांनी विधान भवन परिसरात निदर्शनं केली.

**<><><><>**

राज्यात सर्व 100 टक्के फीडर्सवर स्मार्ट मीटर्स लावण्यात आले असल्याची आणि एकंदर ग्राहकांपैकी फक्त १३ शतांश टक्के लोकांनाच ग्रिड सपोर्ट चार्जेस लावले असल्याची

माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासाला दिली. सतेज पाटील यांनी याबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता. ग्रिड सपोर्ट चार्ज यंदा १ फेब्रुवारीपासून लावला असून पूर्वलक्ष्यी प्रभावाने लावलेला नसल्याचं त्यांनी सांगितलं. आजूबाजूच्या राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात विजेचा दर कमी आहे आणि वर्ष २०२९-३०पर्यंत ते ७ रुपये ४३ पैसे इतकं खाली येईल, जे २० वर्षांच्या कलानुसार १४ रुपये असायला हवं, याकडे त्यांनी लक्ष वेधलं. सरकारच्या विविध योजनांचा लाभ घेणाऱ्यांसाठी सौरऊर्जा पुरवणाऱ्या कंपन्यांची यादी तयार केली असून इतरही सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. एकनाथ खडसे, नीलम गोऱ्हे यांनीही या प्रश्नावरच्या चर्चेत भाग घेतला.

**<><><><><>**

नाशिकमध्ये TCS कंपनीत महिला कर्मचाऱ्यांचा विनयभंग, लैंगिक अत्याचार, धर्मांतराचा प्रयत्न आणि धार्मिक भावना दुखावल्याचं प्रकरण हे डोळे उघडणारं असून राज्यातल्या अनेक कॉर्पोरेट कंपन्यांमध्ये असे प्रकार घडत असल्याचं समोर आलं आहे. अशा घटनांचा अभ्यास करण्यासाठी, याबाबत सध्या लागू असलेले कायदे आणि नियमांचा अभ्यास करून बदल सुचवण्यासाठी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या महिला सदस्यांची समिती स्थापन करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत आज केली. चित्रा वाघ यांनी याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. नाशिक प्रकरणी एकंदर ९ गुन्हे दाखल झाले असून संबंधित ऑपरेशन मॅनेजरवरही गुन्हा दाखल केल्याची माहिती त्यांनी दिली. SITने या प्रकरणाची चौकशी जवळपास पूर्ण केली असून अंतिम अहवाल लवकरच येईल, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

नैर्ऋत्य मोसमी पावसाने महाराष्ट्रात दमदार हजेरी लावली असून राजधानी मुंबई सह अनेक ठिकाणी कालपासून पावसाची संततधार आहे. दीर्घ प्रतीक्षेनंतर आलेल्या पावसामुळे तापमान कमी होऊन मुंबईकरांना उकाड्यापासून दिलासा मिळाला. ऐकूया वृत्तांत आमच्या प्रतिनिधीकडून....

**- - - होल्ड - VC - - -**

*(मुंबई शहर आणि उपनगरात कालपासून सूर्यदर्शन झालं नाही. संततधार पावसामुळे शहराच्या सखल भागात पाणी साचून वाहतुकीला अडथळे होत आहेत. रेल्वे रुळावर पाणी साचल्यानं रेल्वे वाहतूकही प्रभावित झाली आहे. ट्रान्सहार्बर मार्गावर रुळाखाली जमीन खचल्यामुळे काही काळ तिथली सेवा बंद ठेवली होती. रस्त्यांवरची वाहतूकही अनेक ठिकाणी खोळंबली होती. महापौर रितू तावडे यांनी किंग्ज सर्कल परिसरात जाऊन परिसराची पाहणी केली. साचलेल्या पाण्याचा निचरा करण्यासाठी उपसा पंप पूर्ण क्षमतेने कार्यरत असून इतर ठिकाणीही महानगरपालिकेचे कर्मचारी पाणी उपसा करण्यासाठी कार्यरत आहेत असं त्यांनी सांगितलं.*

*मुंबई आणि पालघर जिल्ह्यांसाठी आज हवामान विभागानं मुसळधार पावसाचा रेड अलर्ट दिला असून, समुद्रकिनाऱ्यावर महाकाय लाटा उसळण्याची शक्यताही वर्तवली आहे. ताशी ८० किलोमीटर पर्यंत वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे.)*

रत्नागिरी जिल्ह्यालाही हवामान विभागाने रेड अलर्ट दिला असून ठाणे, रायगड आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट दिला आहे.

नवी मुंबईत पावसाची संततधार सुरूआहे. रात्रभर पडणाऱ्या पावसामुळे एपीएमसी बाजारपेठेच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ पाणी साचलं आहे. त्यामुळे खरेदीसाठी आलेल्या नागरिकांची गैरसोय होत आहे.

सांगलीसह जिल्ह्यात कालपासून ढगाळ वातावरण असून सध्या हलक्या सरी पडत आहेत त्यामुळे हवेत गारवा निर्माण झाला आहे. पेरणी साठी अनुकूल पाऊस नसल्यानं शेतकरी चिंतेत आहेत.

रत्नागिरी जिल्ह्यात कालचा दिवस मुसळधार पावसाचा होता. सगळ्या तालुक्यांमध्ये दमदार पाऊस बरसला. सर्वाधिक १३४ मिलिमीटर पाऊस दापोलीत, तर त्याखालोखाल मंडणगड आणि संगमेश्वरमध्ये प्रत्येकी ११६ मिलिमीटर पाऊस पडला. पावसामुळे अनेक ठिकाणी झाडं कोसळणं , पाणी साचणं अशा प्रकारांसह काही किरकोळ अपघातही घडले. रत्नागिरी तालुक्यात आज सकाळपासून पावसाने विश्रांती घेतली आहे.

कोल्हापूर जिल्ह्यात पावसाच्या सरी बरसू लागल्यानं बळीराजा सुखावला आहे. येत्या चार दिवसात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली असून जिल्ह्याला

यलो अलर्टचा इशारा देण्यात आला आहे. घाटमाथ्यावर वादळी वाऱ्यांसह विजांच्या कडकडाटात पाऊस होईल असाही अंदाज आहे.

जालना शहरासह जिल्ह्यातल्या बहुतांश भागात आज सकाळपासून पावसाची संततधार सुरु आहे. अधून मधून पावसाचा जोर वाढत आहे.
रखडलेल्या खरीपातल्या पेरण्यांसाठी हा पाऊस फायदेशीर ठरण्याची शक्यता आहे.

**<><><><>**

पक्षाच्या खासदारांमधे फूट पडल्याच्या पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार अरविंद सावंत आणि अनिल देसाई आज संध्याकाळी लोकसभा सभापती ओम बिर्ला यांची भेट घेणार आहेत. पक्ष सोडलेल्या सहा खासदारांवर पक्षांतर बंदी कायद्यानुसार अपात्रतेची कारवाई करण्याची मागणी ते सभापतींकडे करतील असं सांगितलं जात आहे. २२ जूनला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या सहा खासदारांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केला आहे.

**<><><><>**

२०२३-२४ आणि २०२४-२५ चे राज्य शासनाचे वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार गडचिरोली जिल्ह्यातल्या तीन शेतकऱ्यांना जाहीर झाले आहेत. २०२३-२४ साठीचा सर्वसाधारण गटातला पुरस्कार आरमोरी तालुक्यातल्या विष्णूपद गाईन यांना तर आदिवासी गटातला पुरस्कार एटापल्ली तालुक्यातल्या दयाराम सिडाम यांना जाहीर झाला आहे. तर २०२४-२५ साठीचा पुरस्कार सर्वसाधारण गटात आरमोरी तालुक्यातल्या पुरुषोत्तम जांभूळकर यांना जाहीर झाला आहे. ४४ हजार रुपयांचा धनादेश, स्मृतीचिन्ह, प्रशस्तिपत्र असं या पुरस्काराचं स्वरुप आहे. मुंबई इथं १ जुलै ला होणाऱ्या कार्यक्रमात राज्यपालांच्या हस्ते पुरस्कारांचं वितरण होईल.

**//<><><><>//**